# नव्या देशात घर

जोआन



शेवटी, कार्ल एरिक आणि त्याच्या परिवाराने स्वीडन ते मिनेसोटातल्या आपल्या नव्या घरापर्यंतचा प्रवास पूर्ण केला. पण कार्ल एरिकसाठी मात्र प्रवास संपल्या नंतर सुद्धा एका नवे साहस त्याची वाट पाहत होते. त्याला एका नव्या शाळेत शिकावे लागणार होते जिथे सगळे शिक्षण इंग्रजीत होते. त्याचे जवळचे शेजारी, स्थानिक इंडियन आहेत. आणि जेव्हा त्याचे वडील जेव्हा कामासाठी दूर शहरात प्रवास करत असतील तेव्हा कार्ल एरिकला घरातल्या अडचणींशी सामना करावा लागेल. ज्यात परिवाराला खाऊ घालणे पण असेल- कार्ल एरिकला कधी नवीन देश आपल्या देशासारखा वाटेल का?



# नव्या देशात घर

मराठी : अश्विनी बर्वे



# १. मिनेसोटा

कार्ल एरिकने आपले डोळे उघडले आणि त्याने त्या अनोळखी खोलीच्या चारी बाजूला बघितले..

ते आता एक स्वप्नं नव्हते.

स्वीडनहून सुरु झालेला लांबचा आणि कठीण प्रवास आता खरंच संपला होता.

आता तो मिनेसोटा मध्ये होता.

त्याची सारा काकू त्याच्याकडे बघून हसत होती.

“तुला खूप भूक लागली असेल,” काकुने विचारले.

काकुने त्याला गरम मक्याच्या ब्रेडचा मोठा तुकडा त्याला दिला. मग त्यांनी त्यात एक कप दूध घातले.

कार्ल एरिकने मोठ्या उत्सुकतेने खाल्लं पिल्लं. खूप काळानंतर त्याला काहीतरी चांगलं खायला मिळालं होतं.

एना स्टिना आपल्या चुलत भावाजवळ आली.

दोन वर्षापूर्वी ती अमेरिकेत निघून आली होती. तेव्हा तिने कार्लला बघितले नव्हते.

“तुम्ही स्वीडनला झाडाच्या सालीपासून बनवलेली पोळी खात होते हे खरं आहे का?” एनाने विचारलं.

“हो," कार्ल एरिक म्हणाला. “आम्ही स्वीडनला भुकेने मरत होतो. आमच्याकडे जवळजवळ तेच शिल्लक होतं.”



"ठीक आहे, आता तू गव्हाची आणि मक्याची पोळी आणि मेपलचे सिरप खा." एना स्टिना आंनदाने म्हणाली. "आणि जोपर्यंत तू स्वतःची खोली तयार करत नाही तोपर्यंत तू आमच्याकडे रहा.चल मी तुला आजूबाजूचा परिसर दाखवते.





कार्ल एरिक आपल्या चुलत बहिणीच्या मागे बाहेर गेला.

"आपण शेजारी असू का?" त्याने एनाला विचारले.

"कदाचित असू," एना हसत म्हणाली. "बाबांना तलावाच्या पलीकडच्या बाजूची चांगली जमीन माहित आहे. ते आता तुझ्या बाबांना तिकडे घेवून जात आहेत.

## 2. घराभोवतीची मोकळी जागा



कार्ल एरिकचे वडील गाडीतून खाली उतरले. त्यांनी हवेत कागद फडकावला. “मी एक दावा दाखल केला आहे,” ते ओरडले.

"मिनेसोटाची १६० एकर जमीनीवर फक्त एक खोली बांधावी लागेल. आणि काही जमीन साफ करावी लागेल.” ते म्हणाले, “मग ती पाच वर्षांनी आपली होईल.”



“बघ, लॉगिंग कॅंप मध्ये काम मिळते आहे,”एक्सल काकांनी आपल्या पत्नीला सांगितले.

“ते एक दिवसाचे एक डॉलर मजुरी देत आहेत. मी त्यातून घोडे खरेदी करू शकतो, ज्यांची मला गरज आहे. आणि एंडर्स आपल्या खोली बांधण्यासाठी खिडक्या,दरवाजे खरेदी करण्यासाठी पुरेसा पैसा मिळवू शकतो. पण आम्ही बऱ्याच काळासाठी घरात नसू.”

“आम्ही इथलं काम सांभाळून घेवू,” सारा काकू म्हणाली.

ज्या दिवशी ते लोक शिबिरासाठी निघाले, कार्ल एरिकच्या वडिलांनी त्याला एका बाजूला नेले.

“बघ,जेव्हा आम्ही इथं नसू,” ते म्हणाले. “तेव्हा तुलाच घराची देखभाल करावी लागेल. आणि जनावरे पकडणाऱ्या जाळ्यांची काळजी घ्यावी लागेल त्यामुळे खायला काही मिळू शकेल.



कार्ल एरिकला आपली जबाबदारी ऐकून अभिमान वाटला. पण वडील आणि काका निघून गेल्यानंतर त्याला खूप काम करावं लागलं.

त्याला रोज गायीचे दूध काढावे लागत असे.



जनावरांना खायला घालावे लागे.



त्याला लाकडं आणि पाणी आणावं लागे.



कधी-कधी जोनास त्याच्या बरोबर जात असे. रोज रात्री कार्ल एरिक, शिकार करण्यासाठी जाळं लावत असे. पण रोज सकाळी ते रिकामेच असे.



"चिंता करू नको," सारा काकू त्याला म्हणाली. “आपल्या जवळ खूप बटाटे आहेत.”

# 3. शाळा

मुलांनी वेगाने सगळे बटाटे खोदून काढण्याचे काम सुरु केले. कारण थोड्याच दिवसात त्यांची शाळा सुरु होणार होती..

“आपल्या इथं काही शाळा नाही” सारा काकूने कार्ल एरिकच्या आईला सांगितलं.

“इथं शाळा,एका शेतातून दुसऱ्या शेताकडे जाते. यावेळी शाळा ओल्सनच्या शेतावर असेल.



ओल्सनच्या शेतावर जाण्यासाठी लांबवर चालत जावं लागणार होतं. तलावाच्या चारी बाजू ओलांडून, जंगल ओलांडल्यावर ते होते.

“बघ," एना स्टिना एका सकाळी म्हणाली. तिने तलावाच्या किनाऱ्यावरील एका “पालं” कडे त्याचे लक्ष वेधले.

“आपले जवळचे शेजारी तिथं राहतात.” कार्ल एरिकने धापा टाकत विचारले.



पण इंडियन लोक “पाला“ त राहतात.” त्याने म्हटले.

“आणि इंडियन, लोकांची कातडी सोलून काढतात.

“तू हे कुठं ऐकलं? तिने विचारलं.

"स्वीडन मध्ये लोक असेच म्हणतात." कार्ल एरिक म्हणाला.



"पण इथले लोक म्हणतात की ओजिबवे म्हणजे इंडियन चांगले शेजारी आहेत,” त्याच्या चुलत बहिणीने म्हटले.

मिस लिंड दरवाज्यात वाट पहात होती. कार्ल एरिकने आपली टोपी काढली. त्याने आपल्या नव्या शिक्षिकेला नमस्कार केला आणि स्वीडिश मध्ये नम्रतेने त्यांना अभिवादन केले.

मग त्याने आत कोणाला हसतांना ऐकले. “ही एक अमेरिकी शाळा आहे.” मिस लिंड म्हणाल्या. “इथं आम्ही केवळ इंग्रजी बोलतो.”



“इथं बस,” मिस लिंड म्हणाल्या.

“तू राल्फ बरोबर पुस्तक वाच.



कार्ल एरिक स्वीडिश मध्ये लिहायला-वाचायला शिकला होता. तो राल्फच्या पुस्तकातून कोणत्याही अक्षरापासून असा शब्द तयार करू शकला नाही, जो त्याला माहित आहे.

त्याने विचित्र शब्दांकडे बघितलं. “मूर्ख स्वीड,” राल्फ फुसफुसला.

जेव्हा मिस लिंड वळली, तेव्हा त्याने कार्ल एरिकचा एक बूट उचलला आणि तो उघड्या खिडकीतून बाहेर फेकून दिला.

कार्ल एरिकचा चेहरा रागाने लाल झाला. तो राल्फला मारण्यासाठी धावला.

मिस लिंड टकन वळाली.

“नाही!“ ती ओरडली. “खूप झालं!”



कार्ल एरिकला दुपारच्या सुट्टीत सुद्धा वर्गात थांबावं लागलं.

मिस लिंड निष्पक्ष नाही. त्याने विचार केला. पण तेव्हाच त्याने पाहिलं.

राल्फ दुसऱ्या मुलांबरोबर खेळत नव्हता. तो लाकडं कापत होता.

मिस लिंडने त्यालाही शिक्षा दिली होती. एक मुलगा खिडकी जवळ आला.

“राल्फचे खरं नाव रॉल्फ आहे,” तो म्हणाला. “तो ही आपल्यासारखा स्वीडनहून आला आहे. तो विसरला की अमेरिकेत नवीन लोकांना कसं वाटतं. पण मी विसरलो नाही. माझं नाव हेनरिक ओल्सन-हेन्री आहे. घेमाझी मेपलची साखर खा.”

“धन्यवाद!" कार्ल एरिक म्हणाला.

कार्ल एरिक माहित होतं की तो मूर्ख नव्हता.तो पण रॉल्फला धडा शिकवणार.

तो पहिल्यापासून गणिताच्या अंकात वेगवान होता. आता तो इंग्रजी शिकण्यासाठी खूप मेहनत करत होता.

मिस लिंडने त्याला एक पुस्तक उधार घेवू दिले.





त्याने घरच्या लांबवरच्या रस्त्यावर एना स्टिनाचे पुस्तक वाचले.

आपलं काम करतांना सुद्धा तो वाचत असे.





“तू शिकारीच्या जाळ्याच्या बाबत इतका चतुर नाही,” जोनास म्हणाला.

“तू यांची इतकी चिंता करू नको.” कार्ल एरिक म्हणाला.

पण जोनास शिकारीच्या जाळ्याबाबत योग्य होता. जेव्हा कार्ल एरिकने जाळ्याचे स्थान बदलले आणि त्यात वेगवेगळा चारा अडकवला.पण तरीही तो कोणतीच शिकार पकडू शकला नाही.



एक दिवस कार्ल एरिकने आपल्या आईला वाचून दाखवलं.ती केवळ काहीच शब्द समजू शकली. पण ती हसली आणि ती म्हणाली की तो एना स्टिनासारखा हुशार आहे.

त्याने घराची जबाबदारी कशी उचलली. त्याचे वडील आणि काका काय म्हणतील.

# ४. आगंतुक

दहा आठवड्यांचे सत्र आता जवळजवळ संपत आले होते.

कार्ल एरिक आता राल्फ इतक्या वेगाने इंग्रजी वाचत होता.

मिस लिंड खूप खुश होती. त्यांनी कार्लला हेनरिकच्या जवळ बसवले.



आता दिवस थंडीचे आणि अंधारे झाले होते.जमिनीवर खूप बर्फ पडले होते.

घरातील पुरुष जाऊन आता तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ झाला होता.



एका सकाळी कार्ल एरिक सोडून सगळेजण शहरात गेले.

तो विस्तव आणि जनावरांची काळजी घेण्यासाठी घरीच राहिला होता.

तो शेकोटीत लाकडं टाकत होता की अचानक खोलीत अंधार झाला. खिडकी कोणीतरी झाकली. कार्ल एरिकने जवळ जाऊन पाहिले आणि तो धापा टाकू लागला.त्याने तो चेहरा जो त्याच्याकडे टक लावून पहात होता तो बघितला. कार्ल एरिक घाबरून एकाच जागी थांबला. एक इंडियन!





तो इंडियन त्याची कातडी सोलणार होता का? कार्ल एरिक मोठ्या मुश्किलीने श्वास घेवू शकला. पण त्याने आपली भीती लपविण्याचा प्रयत्न केला. तो बाहेर इंडियनच्या मागे-मागे गेला.



दरवाजा हळूच उघडला. इंडियन स्वतःला गरम ठेवण्यासाठी खोलीतल्या शेकोटीजवळ गेला. मग तो माणूस दरवाज्याकडे गेला. त्याने कार्ल एरिकला आपल्या मागे येण्याचा इशारा केला.

त्या माणसाने काही दगड उचलले आणि ते जमिनीत गाडले.तो काय करत होता? कार्ल एरिकने विचार केला.मग त्या माणसाने दगडांना खोडलं आणि ते खाण्याचे नाटक केलं. अचानक कार्ल एरिकला समजलं! इंडियनला त्यांचे बटाटे हवे होते! आता काय करायला पाहिजे.?



कार्ल एरिक माहित होतं की स्वीडन मध्ये चांगले शेजारी नेहमी एक दुसऱ्याला मदत करत असत. आणि एना स्टिनाने त्याला सांगितलं होतं की ओजिबवे पण चांगले शेजारी होते.





त्या रात्री कार्ल एरिकने सारा काकुला पूर्ण घटना सांगितली. “तू अगदी बरोबर केलं आहेस,” ती म्हणाली. “तू आपल्या शेजाऱ्यांना बटाटे देवून चांगलं केलं.”



कार्ल एरिकने त्या माणसाला बटाटे ठेवलेल्या जागी घेवून आला. इंडियनने आपल्या पोत्यात बटाटे भरले. त्याने कार्ल एरिकला काही म्हटलं आणि त्याच्या केसांवर थोपटलं आणि हसला. त्यानंतर तो जंगलात परत गेला.

## ५. भेट

शेवटी शाळेचे सत्र संपलं. मग ख्रिसमस जवळ आला.

बायका ख्रिसमसची तशीच तयारी करत होत्या जशी स्वीडन मध्ये करत असत. मेणबत्ती बनवणे, भांडी घासणे, फरशी साफ करणे आणि पदार्थ तयार करणे.



कार्ल एरिक आणि एना स्टिनाला जंगलात एक चांगले ख्रिसमसचे झाड मिळाले. जोनास त्याला कापण्यासाठी त्यांच्याबरोबर गेला.मावस भावांनी ओरडण्याच्या आवाज ऐकला आणि वर बघितलं.



एक इंडियन टोबोगनच्या मदतीने पहाडावरून घसरत येत होता.दोन मुलांनी त्याला मागून पकडलं होतं. ते हसत होते आणि ओरडत होते.



“तो हरिण, चाबूक आणि त्याचा मुलगा आहे,” एना स्टिनाने आपल्या चुलत भावांना म्हटलं. "ओह! हा तोच इंडियन आहे जो बटाटे घ्यायला आला होता!” कार्ल एरिक म्हणाला, “मी उगीच त्याला का घाबरलो होतो?”

त्या रात्री कार्ल एरिकच्या आईने घरातील खजिन्याने भरलेली “पेटी” उघडली.

तिने काही हदयाच्या आकाराच्या कागदाचे तुकडे काढले.

“तुम्हांला हे आठवतं का?” आईने विचारलं.

"ओह हां!" जोनास म्हटला. “मी ते बनवलं होतं! मी ते आता झाडावर टांगू शकतो का?”

“नक्कीच तू करू शकतो,” सारा मावशी म्हणाली.

“आणि मग एना स्टिना तुम्हांला पॉपकॉर्न कसे करायचे हे दाखवेन आणि त्यांना धाग्यात ओवायचं आहे. बिलकुल अमेरिकी लोक जसे करतात तसे.

कार्ल एरिकने बाहेर आवाज ऐकला. ते त्याचे वडील आणि काका एक्सल असू शकतात का? जसा त्याने दरवाजा उघडला आणि बाहेर बघितलं तसं कार्ल एरिकचे हृदय जोरात धडकू लागले.





बर्फावर चांदण्या चमकत होत्या. त्याने दूर कोणालातरी जंगलात गायब झालेलं पाहिलं.

त्याची पाय कशाला तरी लागला.तो मासाचा मोठा तुकडा होता.

“हा कुठून आला?” त्याने विचारलं. सारा काकु हसून त्याला जवळ घेत म्हणाली.

"ओह, कार्ल एरिक, तू अंदाज लावू शकत नाही का? तू आपल्या चांगल्या शेजाऱ्यांना बटाटे दिले होते आणि आता त्यांनी आपल्याला हे मांस दिलं. आपल्या ख्रिसमसची मेजवानी मस्त होईल!

# ६. ख्रिसमस

खोलीत देवदारच्या फांद्या, ताज्या गव्हाचा पाव, तांदुळाचे पुडिंग आणि त्यात घातलेल्या दालचिनीचा सुगंध येत होता. “हा सुगंध स्वीडिश ख्रिसमससारखा आहे.” आईने दीर्घ श्वास घेतला. “एंडर्स आणि एक्सल यावेळी आपल्या बरोबर नाही याचं फार वाईट वाटतं.” तिने भाजलेल्या मासाचे ताट टेबलाच्या मध्ये ठेवले.सारा काकुने प्रार्थना म्हणण्यासाठी कुटुंबाचे नेतृत्व केले. “देवा आम्हांला सुरक्षित ठेवल्याबद्दल तुझे खूप आभार. कृपया आम्हांला सर्वांना लवकरच एकत्र आण.... "



अचानक लीचा दरवाजा उघडला.

थंड हवेचा झोत आला आणि बाहेर दोन माणसं बर्फाने भरलेले उभे होते.

"ज़रा  बघा!“ त्यांच्यातला एक माणूस ओरडला..

“आम्ही मेलो आहोत आणि स्वर्गात आलो आहोत!”

"एंडर्स! एक्सल!“ सारा काकू ओरडली.

दोघांनी आपल्या कोटावरचा बर्फ झटकला.

मुलांनी ओले बूट काढण्यात मदत केली.

सगळ्यांनी एकत्र मिठी मारली.
ते हसत होते आणि बोलत होते.



तेव्हा एक्सलने मांसाचे मोठे ताट बघितले.

“हे काय आहे?” त्याने हैराण होवून विचारलं.

“भाजलेलं हरिण!” त्यांच्या पत्नीने सांगितलं. “यासाठी तुम्ही कार्ल एरिकचे आभार मानू शकतात.”

कार्ल एरिक लाजला आणि खाली बघू लागला. त्याने आपल्या रिकाम्या जाळ्याचा आणि इंडियनला बटाटे देण्याबाबत विचार केला.



“काय?" एक्सल काकांनी हसत म्हटले. “त्या मुलाला आपल्या खारुताईच्या जाळ्यात हरिण सापडलं काय?”

त्याचे वडील आणि एक्सल काका त्याच्यावर नाराज असले तरी त्याने काय फरक पडणार होता?

जेव्हा ते खात होते तेव्हा सारा काकूने त्या दोघांना सगळं काही सांगितलं, जे त्यांच्या गैरहजरीत झालं होतं. "कार्ल एरिक" त्याचे काका म्हणाले, “इकडे बघ.”

कार्ल एरिकने हळूच आपली मान वर केली. एक्सल काका हसत होते.

“तू खूप चांगले काम केले,” ते म्हणाले, “तुझा आम्हांला खूप गौरव वाटतो.”





सकाळ होताच जोनासने कार्ल एरिकला उठवलं.

“बघा! आपल्या मोज्यात सफरचंद आणि मिठाई आहे!” जोनास ओरडला.



“आता झोपायची वेळ,”सारा काकू म्हणाली.

“पण आई," एना स्टिना म्हणाली. “आम्हांला आमचे मोजे टांगायचे आहेत!”

“पण माझे मोजे ओले नाहीत,” जोनास म्हणाला.

“तू बघच!” एना स्टिना हसली.



बाहेर अजूनही अंधार होता. दोन माणसं बैलांना उठवत होते. त्यांनी बिना चाकांची गाडी (स्लेज) मध्ये घास भरला होता.

“यात चढा!" एक्सल काका ओरडले, आणि मग त्यांनी त्यांना एका अस्वलाच्या कातड्यात लपेटले.

ते दाट बर्फातून गेले, त्यांची बिनचाकाच्या गाडीची घंटीचा आवाज अंधाऱ्या जंगलात एकमेव होता.



आपल्या परिवारा सोबत कार्ल एरिकला ऊब आणि आनंद वाटत होता. त्याला आपल्या नव्या देशात, घरच्या सारखेच वाटत होते.



जसे ते शहराच्या जवळ आले, कार्ल एरिकने मशालींचा चमचमणारा प्रकाश बघितला जो चर्चच्या बाहेर बर्फातल्या गढीतून येत होता. त्याने आतून येणाऱ्या जुन्या स्वीडिश ख्रिसमस भजनांचा आवाज ऐकला. कार्लने आपला नवीन दोस्त हेनरिकला बघितलं.

# लेखकाची नोट

१८६८ आणि ६९च्या "भूक वर्ष" च्या दरम्यान ५०,००० पेक्षा अधिक स्वीडन अमेरिकेत आले. अधिकांश लोक शहरात नोकरी शोधण्यासाठी किंवा नवीन होमस्टेड अधिनियमानुसार तयार केलेल्या मुक्त भूमीवर शेती करण्यासाठी पश्चिमेला गेले. खूप सारे लोक मिनेसोटा मध्ये वसले. जिथे त्यांना स्वीडनच्या जंगलाची आणि तलावाची आठवण आली. त्यांना मदत करणारे नेहमी त्यांचे दोस्त किंवा कुटुंब असे. १८७० पर्यंत २०००० स्थलांतरीत स्वीडिश भाषिकांनी मिनेसोटामध्ये आपल्या स्वतःच्या समुहाचे चर्च निर्माण केले. खरंतर अमेरिकी शाळेत, स्थलांतरीत मुलांना वर्गात आणि खेळाच्या मैदानात दोघांना इंग्रजी बोलणे अनिवार्य होते. काळा बरोबर इतर स्थलांतरीत समुहांसारखी स्वीडनहून आलेल्या लोकांनी आपल्या नव्या भूमीची भाषा आणि रीतीरिवाज आपलेसे केले, पण ते आपल्या मातृभूमीची भाषा आणि रीतीरिवाज पूर्णपणे कधीच विसरले नाही.

समाप्त